नाशिक
दि. १९/०५/२०२१

# प्रेसनोट

**आलोसे क्र.१) अनिल चंद्रभान दळवी, वन परिमंडळ अधिकारी, २) उस्मान गणी गणीमलंग सय्यद वनरक्षक, व ३) सुरेखा अश्रुबा खजे, वनरक्षक तिघे नेमणुक वन परिमंडळ कार्यालय वणी, ता.दिंडोरी, जि.नाशिक यांना ५०,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक पथकाने भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ व १२ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | १) अनिल चंद्रभान दळवी, वन परिमंडळ अधिकारी,<br>२) उस्मान गणी गणीमलंग सय्यद, वनरक्षक,<br>३) सुरेखा अश्रुबा खजे, वनरक्षक,<br>तिघे नेमणुक वन परिमंडळ कार्यालय वणी, ता.दिंडोरी, जि.नाशिक. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | ५०,०००/— रुपये (तडजोडीअंती) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ००/— रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे चिंचखेड गांवातील शेतजमिनीचे बाजुस असलेल्या वन क्षेत्रातून पाण्याची पाईपलाईन घेण्याकारीता चरी खोदली होती. सदर खोदलेल्या चरीवरुन तक्रारदार यांचेवर कारवाई न करण्यासाठी **आलोसे क्र. १)** अनिल चंद्रभान दळवी, वन परिमंडळ अधिकारी, **२)** उस्मान गणी गणीमलंग सय्यद वनरक्षक, व **३)** सुरेखा अश्रुबा खजे, वनरक्षक तिघे नेमणुक वन परिमंडळ कार्यालय वणी, ता.दिंडोरी, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने दि. १८/०५/२०२१ रोजी सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान **आलोसे क्र.२)** उस्मान गणी गणीमलंग सय्यद वनरक्षक, वन परिमंडळ कार्यालय वणी, ता.दिंडोरी, जि.नाशिक यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती ५०,०००/— रुपये लाचेची मागणी केली. सदर लाचेच्या मागणीस **आलोसे क्र.१)** अनिल चंद्रभान दळवी, वन परिमंडळ अधिकारी, व **आलोसे क्र. ३)** सुरेखा अश्रुबा खजे, वनरक्षक, यांनी प्रोत्साहन दिल्याने आज दि. १९/०५/२०२१ रोजी तिघांनाही पकडण्यात आले असून तिघांविरुध्द वणी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई चालु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

( विजय जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता